
07 APR 2024 लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. व्ही. एन. शिंदे यांना मराठी विज्ञान परिषदेचा पुरस्कार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव, प्रसिद्ध विज्ञान लेखक डॉ. व्ही. एन. शिंदे यांना मराठी विज्ञान परिषदेचा प्रतिष्ठेचा सुधाकर उद्धवराव आठले पुरस्कार २८ एप्रिल रोजी मुंबई येथे देण्यात येणार आहे, अशी माहिती परिषदेचे कार्यवाह प्रा. भालचंद्र भणगे यांनी शनिवारी दिली.

मराठी विज्ञान परिषदेतर्फे समाजात विज्ञान प्रसार, तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याकरिता किमान दहा वर्षे विविध प्रकारे कार्य करणाऱ्या व्यक्तीला २५ हजार रुपये आणि सन्मानपत्र स्वरूपातील हा पुरस्कार देऊन गौरविले जाते. डॉ. शिंदे हे गेली अनेक वर्षे विज्ञान लेखनाच्या माध्यमातून वैज्ञानिक प्रसार व जागृतीचे कार्य करीत आहेत. एककांचे मानकरी, हिरव्या बोटांचे किमयागार, असे घडले भारतीय शास्त्रज्ञ, आवर्त सारणी व मूलद्रव्यांची दुनिया, एककांचे इतर मानकरी आणि कृषी क्रांतीचे शिलेदार ही त्यांची पुस्तके प्रकाशित आहेत.



डॉ. शिंदे यांना पुरस्कार जाहीर झाल्यावर कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी अभिनंदन पत्र, पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. डॉ. शिंदे विज्ञान प्रसाराच्या क्षेत्रातील प्रबोधनाचे कार्य निरंतर करीत राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, वाणिज्य अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सागर डेळेकर उपस्थित होते.


07 APR 2024

वार्तासम्राट

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ.उत्तम सकट यांना महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल विद्यापीठाच्या वतीने सत्कार

## डॉ.सकट यांच्या सामाजिक कार्याचा शिवाजी विद्यापीठाला अभिमान - डॉ.दिगंबर शिर्के



डॉ.उत्तम सकट यांचा सत्कार करतांना कुलगुरू डॉ.दिगंबर शिर्के प्र-कुलगुरू डॉ.प्रमोद पाटील, अधिष्ठाता डॉ.श्रीकृष्ण महाजन, उपकुलसचिव डॉ.एस.एम.कुबल आदि मान्यवर

कोल्हापूर, दि.१५ मार्च - प्रामाणिक आणि जबाबदारीने कामे करणारे विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ.उत्तम सकट यांच्या सामाजिक कार्याचा विद्यापीठाला अभिमान आहे, असे कौतुकोद्गार डॉ.दिगंबर शिर्के यांनी काढले.

डॉ.सकट यांना महाराष्ट्र शासनाचा २०२२-२३ साठीचा साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल प्रशासनाच्यावतीने विद्यापीठाच्या व्यवस्थापन सभागृहामध्ये सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

कुलगुरू डा.शिर्के पुढे म्हणाले, डॉ.सकट विद्यापीठाच्या लोकविकास केंद, वाहन विभाग, लेखा विभागामध्ये उत्तम कामगिरी केलेली आहे. कार्यालयीन जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत सामाजिक जाणीव ठेवून पीएच.डी.संशोधनासाठी केलेल्या प्रबंधाचे पुढे समाजासाठी उपयोग होणे आणि त्याची दखल शासन पातळीवर घेतली जाणे, हे निश्चित विद्यापीठासाठी भूषणावह आहे. त्यांचे सामाजिक कार्य सर्वांसाठी आदर्शवत असे आहे.

याप्रसंगी, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.प्रमोद पाटील, अधिष्ठाता डॉ.श्रीकृष्ण महाजन, उपकुलसचिव डॉ.एस.एम.कुबल यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी, कुलसचिव डॉ.विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ.सुहासिनी पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.अजितसिंह जाधव, आजीवन अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, राष्ट्रीय सेवा योजनाचे संचालक डॉ.तानाजी चौगुले, कायदा अधिकारी अनुष्का कदम, उपकुलसचिव डॉ.वैभव ढेरे यांचेसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
07 APR 2024 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सतत शिकण्याची, नवीन गोष्टी शोधण्याची प्रेरणा घ्या : डॉ. गुरव

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विद्यार्थ्यांना सतत शिकण्याची आणि नवीन तंत्रज्ञान आणि संशोधनाशी अपडेट राहण्याची गरज आहे. वेळेचे नियोजन करून अभ्यासासाठी पुरेसा वेळ द्या, विविध पुस्तके आणि लेख वाचून स्वतःला अपडेट ठेवा आणि समाजासाठी योगदान देण्यासाठी प्रयत्नशील राहा, असे मार्गदर्शन वनस्पतीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. आर.व्ही. गुरव यांनी केले.



शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागातील एमएस्सी भाग दोनच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. यावेळी डॉ. आर. व्ही. गुरव यांचे स्वागत डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागात आयोजित एम.एस्सी. भाग २ च्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. याप्रसंगी डॉ. गुरव 'बदलत्या जगात विज्ञान आणि शिक्षणाची भूमिका' या विषयावर बोलत होते. शिक्षण आणि परीक्षा, सोशल मीडियाचा प्रभाव, शिक्षकांची भूमिका आणि व्यक्तिमत्त्व विकास या मुद्यांवरही त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात विभागप्रमुख प्रा. डॉ. आर.जी. सोनकवडे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व आणि जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गुणांबद्दल मार्गदर्शन केले.

प्रारंभी गंगावती सुतार, अनिरुद्ध पुरोहित, सिद्धी पाटील, तुषार सुतार या विद्यार्थ्यांनी मनोगत मांडले. श्रुती खराडे आणि साधना परीट यांनी सूत्रसंचालन केले. अदिती गुरव हिने आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 APR 2024
तरुण भारत

# शहरातील २६ केंद्रावर आज सेटची परीक्षा

## १ लाख २८ हजार विद्यार्थी परीक्षा देणार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेण्यात येणारी सेट परीक्षा आज (दि. ७) रोजी शहरातील २६ केंद्रांवर दोन सत्रात होणार आहे. पहिला पेपर सकाळी १० ते ११ या वेळेत असून दुसरा पेपर सकाळी ११.३० ते दुपारी १.३० या वेळेत होणार आहे. या परीक्षेला शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर केंद्रावरून १ लाख २८ हजार विद्यार्थी बसणार आहेत, अशी माहिती कोल्हापूर केंद्र समन्वयक डॉ. प्रशांत अनुभुले यांनी दिली.

परीक्षा केंद्र परीसरात पोलीस बंदोबस्त करण्यात आला आहे. पुण्यावरून २६ निरीक्षक कोल्हापुरात दाखल झाले असून, त्यांनी परीक्षा केंद्रांची पाहणी केली. विद्यार्थ्यांनी नियमांच्या आधिन राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन केले आहे.

**ऑफलाईन शेवटची परीक्षा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेण्यात येणारी पहिली सेट परीक्षा १९९५ साली महाराष्ट्र व गोवा दोन राज्यात झाली होती. आज होणारी ३९ वी ऑफलाईन पध्दतीने होणारी अखेरची परीक्षा आहे. कारण पुढच्या वर्षीपासून ऑनलाईन पध्दतीने सेट परीक्षा होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 7 APR 2024
पुढारी

# आज सेट परीक्षा; ११ हजार ६८५ विद्यार्थी बसणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्यावतीने रविवारी (दि. ७) ३९ व्या राज्य पात्रता परीक्षेचे (सेट) होणार आहे. जिल्ह्यातून सुमारे ११,६८५ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. सकाळी १० ते ११ व ११.३० ते १.३० या दोन सत्रांत परीक्षा होईल.

सेट परीक्षेंतर्गत जिल्ह्यात २६ केंद्रे असणार आहेत. यात शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र विभाग इमारत, रसायनशास्त्र विभाग, तंत्रज्ञान अधिविभाग, भाषा भवन यांसह विवेकानंद कॉलेज, महावीर कॉलेज, न्यू कॉलेज, स. म. लोहिया हायस्कूल व ज्यु. कॉलेज, प्रिन्सेस पद्माराजे गर्ल्स हायस्कूल, राजाराम कॉलेज, कॉमर्स कॉलेज, शाहू कॉलेज, सायबर कॉलेज आदी केंद्रांवर ऑफलाईन पद्धतीने परीक्षा होणार आहे, अशी माहिती सेट-नेट परीक्षा समन्वयक प्रा. डॉ. प्रशांत अनभुले यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 APR 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठात 'सेट-नेट' कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित 'सेट-नेट परीक्षेला सामोरे जाताना व उच्च शिक्षणातील संधी' या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळा उत्साहात झाली. शिक्षणशास्त्र अधिविभाग, सेंट्रल प्लेसमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा झाली. यामध्ये अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. गजानन राशिनकर, डॉ. राजन पडवळ, डॉ. रूपाली संकपाळ, डॉ. कृष्णा पाटील, डॉ. शशिकांत शिंदे, डॉ. आसावरी जाधव, गंगाराम पवार या तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेला ११० विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी आजीवन शिक्षण विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सहभागी विद्यार्थी कोमल गुरव, अजित कपाळे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन स्मिता पाटील यांनी केले. नेहा लाटे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 7 APR 2024
तरुण भारत

# विद्यापीठात सेट-नेट कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभाग आणि सेंट्रल प्लेसमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने 'सेट-नेट परीक्षेला सामोरे जाताना व उच्च शिक्षणातील संधी' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. आजीवन शिक्षण विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. नेट-सेट परीक्षेमधील अभ्यासासाठी येणाऱ्या अडचणी या विषयावर डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. गजानन राशीनकर, डॉ. राजन पडवळ, डॉ. रूपाली संकपाळ, डॉ. कृष्णा पाटील, डॉ. शशिकांत शिंदे, डॉ. आसावरी जाधव, गंगाराम पवार यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत ११० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. दरम्यान कोमल गुरव, अजित कपाळे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन स्मिता पाटील यांनी केले. नेहा लाटे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 APR 2024
लोकमत

# विद्यापीठात सेट-नेटबाबत कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभाग आणि सेंट्रल प्लेसमेंट सेल यांच्यातर्फे 'सेट-नेट परीक्षेला सामोरे जाताना आणि उच्च शिक्षणातील संधी' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेला चांगला प्रतिसाद मिळाला.

नेट-सेट व परीक्षेमधील अभ्यासक्रमांतर्गत येणाऱ्या सर्व दहा घटकांवर आधारित विविध विषयांवर अधिविभाग प्रमुख डॉ.चेतना सोनकांबळे, डॉ.विद्यानंद खंडागळे, डॉ.गजानन राशीनकर, डॉ.राजन पडवळ, डॉ.रूपाली संकपाळ, डॉ.कृष्णा पाटील, डॉ.शशिकांत शिंदे, डॉ.आसावरी जाधव, गंगाराम पवार या विषय तज्ज्ञांनी मार्गदर्शनपर व्याख्याने घेतली.

डॉ.सोनकांबळे यांनी सेट-नेट परीक्षेचे महत्त्व व त्यास सामोरे जाताना घ्यावयाची दक्षता याविषयी माहिती दिली. कार्यशाळेला पदव्युत्तर शिक्षण घेणारे, तसेच पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झालेले ११० विद्यार्थी सहभागी झाले. समारोप समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून आजीवन शिक्षण विभागाचे संचालक डॉ.रामचंद्र पवार होते. विद्यार्थी कोमल गुरव आणि अजित कपाळे यांनी मनोगत व्यक्त केले. स्मिता पाटील यांनी सूत्रसंचालन केले. नेहा लाटे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 APR 2024
पुण्यनगरी

# 'ॲडव्हान्स अकाऊंटन्सी पेपर ३' बुधवारी


कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. २१ मार्चपासून सुरू आहेत. दि. १ एप्रिल रोजी ॲडव्हान्स अकाऊंटन्सी पेपर ३ आयोजित केला होता; मात्र या विषयाची पुनश्च परीक्षा बुधवार, दि. १० रोजी सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेत होणार असल्याची माहिती परीक्षा विभागाने दिली आहे. शनिवारी ४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. यासाठी ११३ पैकी ११ विद्यार्थी अनुपस्थित होते, तर दिवसभरात ६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 APR 2024
[illegible]

# इनोव्हेशन प्रकल्प सादरीकरणात शिवाजी विद्यापीठातील जीवरसायनशास्त्र विभागाच्या बंडू कोळी याचे यश

कोल्हापूर /प्रतिनिधी : शिवाजी विद्यापीठाच्या जीवरसायनशास्त्र अधिविभागाचा विद्यार्थी बंडू कोळी याने विद्यापीठासह राज्यस्तरीय इनोव्हेशन स्पर्धेत यश संपादन केले आहे.

विद्यापीठाच्या जीवरसायनशास्त्र अधिविभागात प्रथम वर्षात शिकणाऱ्या बंडू कोळी याने 'Biofertilizer from discarded media and water Hygiene' या विषयावर पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालय येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत इनोव्हेशन प्रकल्प सादर केला. या प्रकल्पाला तेथे प्रथम क्रमांक प्राप्त झाला. तत्पूर्वी, त्याने विद्यापीठात विज्ञान दिनानिमित्त आयोजित पोस्टर प्रेझेंटेशन आणि वक्तृत्व स्पर्धेत



बंडू कोळी

अनुक्रमे प्रथम आणि दुसरा क्रमांक प्राप्त केला. सांगलीतील विलिंग्डन महाविद्यालयात आयोजित सेमिनारमध्येही तृतीय क्रमांक मिळविला. कोळी याला अधिविभागप्रमुख डॉ. कैलास डी. सोनवणे, डॉ. पद्मा दांडगे, डॉ. ज्योती जाधव, डॉ. प्रदीप गुरव, डॉ. पंकज पवार, डॉ. संदीप काळे यांचे मार्गदर्शन लाभले.